
२००५
सार्वजनिक बांधकाम विभाग
महाराष्ट्र शासन
CITIZENS' CHARTER
नागरिकांची सनद

# महाराष्ट्र शासन

## सार्वजनिक बांधकाम विभाग

## नागरिकांची सनद

**मंत्री**

**सार्वजनिक बांधकाम**

**(सार्वजनिक उपक्रम वगळून)**

महाराष्ट्र शासन

**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२**

दिनांक २० जुलै २००५.



# शुभेच्छा

" नागरिकांची सनद " ही पुस्तिका सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यपद्धतीचा आरसा असलेली सनद आपल्या विभागाच्या वतीने प्रकाशित करण्यात येणार, ही अत्यंत समाधानकारक व आनंददायी गोष्ट आहे.

महाराष्ट्राच्या गौरवशाही इतिहासात अत्यंत महत्वाचा असा आपला सार्वजनिक बांधकाम विभाग आहे. नागरिकांसाठी उत्तमोत्तम दर्जाच्या विविध सुविधा या विभागाच्या वतीने देण्यात येतात. त्यामुळे आतापर्यंतच्या कालखंडात केलेल्या कार्यामुळे विभागावर नागरिकांचा मोठा विश्वास आहे. यापुढेही उत्तम दर्जा, सुरक्षितता विचारात घेऊन व सामाजिक बांधिलकी जोपासून सेवा देण्याचा निर्धार " नागरिकांची सनद " द्वारे करावा, असे मला वाटते.

आपल्या कार्यकर्तृत्वाने विभागाने कार्यरत राहून " नागरिकांची सनद " अधिकाधिक लोकांपर्यंत कशी पोहोचेल याकडे जागरुकतेने पाहावे. त्यायोगे ही सनद प्रकाशित करण्याचा उद्देश सफल होईल अशा सदिच्छा व शुभेच्छा देतो.

**(छगन भुजबळ)**

मंत्री
सार्वजनिक बांधकाम
(सार्वजनिक उपक्रम)
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २० जुलै २००५.



## शुभेच्छा

जवळपास दिडशे वर्षांची परंपरा असलेला राज्याचा सार्वजनिक बांधकाम विभाग अधिकाधिक लोकाभिमुख होऊन राज्यातील सर्वसामान्य जनतेस त्याची अधिक माहिती होण्याच्या दृष्टीने " नागरिकांची सनद " प्रकाशित होत असल्याचे वाचून आनंद वाटला.

राज्याच्या विकासासाठी रचनात्मक कार्य करीत असलेला सार्वजनिक बांधकाम विभाग हा नागरिकांसाठी त्यांना विविध सोईसुविधा निर्माण करण्याच्या दृष्टीने सतत कार्यरत राहणारा विभाग आहे. सामजिक बांधिलकी म्हणून हा विभाग आपले कर्तव्य करीत आहे. हीच बाब अधिक स्पष्टपणे व सोप्या शब्दांत " नागरिकांची सनद " द्वारे जनतेच्या समोर आपण ठेवीत आहोत, ही अत्यंत चांगली बाब आहे.

या " नागरिकांची सनद " द्वारे आपला विभाग अधिक पारदर्शी होऊन राज्यातीलच नव्हे तर देशातील जनतेच्या प्रेमाचे व विश्वासाचे प्रतिक होवो, अशी हार्दिक शुभेच्छा !

Deshmukh.

(अनिल देशमुख)

**राज्य मंत्री**
**सार्वजनिक बांधकाम, वने, पर्यावरण व**
**आदिवासी विकास**
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २० जुलै २००५.



*“ नागरिकांची सनद ” पुस्तिका शासनातर्फे प्रकाशित करण्यात येत असल्याचे वाचून आनंद वाटला. सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची सविस्तर माहिती उपलब्ध करून देणाऱ्या या पुस्तिकेस माझ्या हार्दिक शुभेच्छा.*

*सार्वजनिक बांधकाम हा खऱ्या अर्थाने जनतेच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. रस्ते, पूल आणि सार्वजनिक इमारती या गोष्टी राज्याच्या आणि पर्यायाने जनतेच्या विकासाला हातभार लावणाऱ्या आहेत. जितकी जलद वाहतूक तितकी जलद प्रगती हे सूत्र आता सर्वसामान्य झालेले आहे. म्हणूनच रस्ते म्हणजे देशाच्या विकासाच्या रक्तवाहिन्या आहेत असे म्हटले जाते. समतोल आणि जलद विकासासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे महत्त्व अनन्यसाधारण असेच आहे. जनतेला या विभागाची सखोल माहिती व्हावी याकरिता “ नागरिकांची सनद ” ही पुस्तिका अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.*

*“ नागरिकांची सनद ” या पुस्तिकेद्वारे सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन आणि जनता यांमध्ये सलोख्याचे आणि जिव्हाळ्याचे संबंध प्रस्थापित होण्यास मदत होणार आहे.. ‘आपल्या या उपक्रमास माझ्या पुनश्च हार्दिक शुभेच्छा.*

***(रविंद्र पाटील)***

# सूची


| अ.क्र. | तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | प्रस्तावना | १ |
| २. | विभागाची बांधिलकी व नागरिकांची जबाबदारी | ३ |
| ३. | विभागाची रचना | ४ |
| ४. | कार्यपूर्तीचे वेळापत्रक, माहितीची सुलभता व खाजगीकरण | ६ |
| ५. | वाहतुकीस सुरक्षित रस्ते | ७ |
| ६. | गा-हाण्यांचे निराकरण, सनदेचा आढावा व जनसामान्यांची छाननी | ८ |
| ७. | सनदेची अंमलबजावणी | ९ |
| ८. | परिशिष्टे | १० ते १४ |

## १. प्रस्तावना

महाराष्ट्र शासनाचा सार्वजनिक बांधकाम विभाग हा सुमारे १५० वर्षाहून जास्त अशी गौरवशाली परंपरा असलेला महत्वाचा विभाग आहे. हा विभाग नागरिकांना खालील सुविधा पुरविण्यास बांधील आहे. ही बांधिलकी सार्वजनिक बांधकाम विभाग या सनदेव्दारे जाहीर करीत असून, ती स्वीकारीत आहे. सार्वजनिक सेवा तत्परतेने , सौजन्य पूर्वक व सन्मानपूर्वक वागणूक मिळून उपलब्ध व्हाव्यात व नागरिकांचे सामायिक प्रश्न सहानुभूतीपूर्वक सोडवावेत हा दृष्टीकोन ही सनद तयार करतांना नजरेसमोर ठेवला आहे.

१) शासकीय इमारतींची (कार्यालयीन तसेच निवासी गाळे) नवीन बांधकामे उत्तम गुणवत्तेची, टिकाऊ, सुरक्षित, अत्यावश्यक सुविधायुक्त, सौंदर्यपूर्ण व सभोवतालचा परिसर सुशोभित करणारी अशी करणे.

२) रस्ते विकास योजनेतील रस्त्यांची नवीन बांधकामे, सुधारणा, तसेच त्यावरील मोठे पूल, लहान पूल, मो-या यांची बांधकामे उत्तम दर्जाची व सुरक्षित अशी करणे.

३) इमारती, रस्ते व पुलांची नियतकालीक देखभाल व दुरुस्ती उपलब्ध होणा-या निधीतून प्रभावीपणे करणे व सेवा सुविधांचा स्तर उंचावत नेणे.

४) इतर सर्व शासकीय विभागांना तांत्रिक सल्ला देणे.

५) सार्वजनिक ठिकाणी जनतेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने तसेच अतिमहत्वाच्या व्यक्तिसाठी वापरावयाचे मंडप, स्टेज इ. बाबतीत सुरक्षिततेच्या दृष्टीने तपासणी करुन प्रमाणित करणे.

६) आपत्कालीन व्यवस्थेसाठी तत्परतेने स्थापत्य अभियांत्रिकीशी संबंधित आवश्यक ती कामे करणे व मदत करणे.

७) सर्व कार्यालयात प्रतिसाद वेळापत्रक प्रदर्शित करणे.

८) ठेकेदारांची नोंदणी प्रमाणपत्रे व विविध ना-हरकतीचे दाखले विहित कालावधीत निर्गमित करणे.

९) विभागापर्यंतच्या सर्व कार्यालयांना आय.एस.ओ-९००१/२००० प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे.

१०) सर्व कार्यालयातून कर्मचारीवर्गाची कर्तव्ये व जबाबदा-या फलकावर जाहीररित्या प्रदर्शित करणे.

११) प्रत्येक कार्यालयात ठरवून दिलेल्या दिवशी व वेळी सर्वसामान्य जनतेची गा-हाणी / तक्रारी ऐकणे व त्यांचे प्रभावीपणे निराकरण करणे.

१२) ''माहितीचा अधिकार अधिनियम'' अंतर्गत मागितलेली माहिती संबंधितांना विहित मुदतीत उपलब्ध करुन देणे.

१३) विभागाच्या कामकाजात सातत्य ठेऊन व आधुनिकता आणून विभागाची लोकाभिमुखता वाढविणे.

१४) नागरिकांच्या सनदेस व्यापक प्रसिध्दी देणे.

१५) संगणकीकरणाबाबत सर्व विभागीय कार्यालये, मंडळ कार्यालये, प्रादेशिक कार्यालये, तसेच, मंत्रालय यांना नेटवर्कने जोडून आवश्यक माहिती उपलब्ध होण्यासाठी प्रयत्नशील राहणे. विभागाची विविध माहिती www.mahapwd.com या वेबसाईटवर अद्यावत उपलब्ध करणे.

२. (१) **बांधिलकी**

वरील सर्व कर्तव्ये पार पाडतांना सार्वजनिक बांधकाम विभाग

अ) सेवेच्या गुणवत्तेची बांधिलकी ठेवील.

ब) सौजन्यपूर्ण व मदतीची वृत्ती ठेऊन कामाचा वेळेत निपटारा करेल.

क) पारदर्शकता व निष्ठा ठेवील.

यासाठी वेळोवेळी विविध परवानापत्रे / प्रमाणपत्रे मिळविण्यासाठी कार्यपध्दती, पत्रके नागरिकांच्या माहितीसाठी उपलब्ध करण्यात येतील.

(२) **नागरिकांची जबाबदारी**

??शासकीय अधिकारी / कर्मचारी यांचेशी नागरिकांची वर्तणूक सौजन्यपूर्वक असावी.

??नागरिकांकडून आवश्यक असलेली माहिती व कागदपत्रे परिपूर्णरित्या मिळावी.

?? नागरिकांचा प्रतिसाद विकासाला मदत करणारा असावा.

?? विहित केलेल्या कालावधीपेक्षा कमी कालावधीत सेवा पुरविण्याचा आग्रह धरु नये.

?? सार्वजनिक मालमत्तेची व्यवस्था पाहण्यास सहकार्य करावे.

?? नागरिकांनी स्वेच्छेने अतिक्रमणे दूर करावीत व पुन्हा सरकारी जागांवर अतिक्रमणे करु नयेत.

?? रस्त्यांच्या दोन्ही बाजूंना असणा-या वृक्षराजींचे जतन ही नागरिकांची सुध्दा जबाबदारी राहिल.

?? नागरिकांनी कायदेशीर तरतुदी, नियम, अलिखित संकेत यांचे पालन करावे.

## ३. <u>सार्वजनिक बांधकाम विभागाची रचना</u>

शासन स्तरावर मा. मंत्री (सार्वजनिक बांधकाम), मा.मंत्री सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम), तसेच मा. राज्यमंत्री (सार्वजनिक बांधकाम) यांचे अधिपत्याखाली विभागाचे दोन सचिव [(सचिव (रस्ते) व सचिव (बांधकामे)] हे सर्वोच्च प्रशासनिक अधिकारी आहेत. शासन स्तरावर विविध धोरणात्मक निर्णय, विभागाचा अर्थसंकल्प, राष्ट्रीय महामार्ग/ राज्य महामार्ग, इतर रस्ते, शासकीय इमारती याचे बांधकाम, देखभाल /दुरुस्ती, इत्यादी बाबी हाताळल्या जातात.

प्रादेशिक स्तरावर मुख्य अभियंता हे सर्वोच्च तांत्रिक अधिकारी असतात. त्यांची मुख्यालये, मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर व

अमरावती या ठिकाणी आहेत. प्रादेशिक विभागांतर्गतची कामांची अंमलबजावणी व प्रशासनिक नियंत्रण मुख्य अभियंता स्तरावर केले जाते.

नंतर, जिल्हा स्तरावर सर्वसाधारणपणे अधीक्षक अभियंता दर्जाचे अधिकारी असून, ते मंडळांतर्गत कामांची अंमलबजावणी व प्रशासनिक नियंत्रण यास जबाबदार असतात. सा. बां. मंडळांव्यतिरिक्त दक्षता व गुणनियंत्रण मंडळ हे एका अधीक्षक अभियंत्याच्या अधिपत्त्याखाली प्रत्येक प्रादेशिक विभागात कार्यरत असते. त्यांचे मुख्य काम म्हणजे तक्रार अर्जांची चौकशी करणे, बांधकामांची गुणवत्तादृष्टया निरिक्षणे करणे व विभागांतर्गत प्रशिक्षण देणे. तसेच, बांधकाम साहित्यांची प्रयोगशाळेत चाचणी करणे हे आहे. क्षेत्रिय अधीक्षक अभियंता यांचे अधिपत्याखाली सर्वसाधारणपणे ५ ते ६ कार्यकारी अभियंता कार्यरत असून, त्यांचे प्रत्येकाचे कार्यक्षेत्र सर्वसाधारणपणे ३ ते ४ तालुक्यांचे असते. सर्वसाधारणपणे प्रत्येक तालुक्यास उप अभियंता असतो. राज्यक्षेत्र व स्थानिक क्षेत्र (जिल्हा परिषद) यांचेकडील कामांसाठी स्वतंत्र कार्यकारी अभियंता व उप अभियंता असतात. सोबत वृक्ष तक्ता जोडला आहे.(परिशिष्ट ‘अ’)

कांही मंडळ कार्यालयांकडे मात्र २ ते ३ जिल्हयांचे कार्यक्षेत्र असते. कार्यकारी अभियंता यांचे अधिकार क्षेत्रातील सार्वजनिक बांधकाम विभाग हा ख-या अर्थाने माहितीचा स्त्रोत असतो. कुठल्याही बांधकामाची सविस्तर माहिती अगदी सुरवातीपासून अशी संबंधीत कार्यकारी अभियंता यांचे कार्यालयात मिळू शकते.

वरील स्थापत्य अभियांत्रिकी रचनेव्यतिरिक्त किनारी अभियांत्रिकी, यांत्रिकी, विद्युत, संकल्पचित्र, वास्तुशास्त्र, उपवने व

उद्याने अशा विविध शाखा असून यापैकी यांत्रिकी विभाग पाटबंधारे विभागाच्या नियंत्रणाखाली आहे. इतर शाखांची विशिष्ट कामे विद्युतीकरण, किनारी अभियांत्रिकी, संकल्पचित्र, संशोधन कार्य, नकाशे/ आराखडे तयार करणे, बगीचांचे निर्माण व त्यांची देखभाल इ. कामे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियंत्रणाखालीच करण्यात येतात.

प्रस्तावनेत नमूद केलेल्या सार्वजनिक सेवा सार्वजनिक बांधकाम विभाग पुरवित असतो. कामांच्या अंमलबजावणीसाठी सा. बां. नियमावली, लेखा संहिता, विनिर्देश, वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, परिपत्रके इ. चे काटेकोरपणे पालन क्षेत्रिय अधिका-यांकडून केले जाते.

सा.बां.विभागाचे अंतर्गत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ असून त्याचे पदसिद्ध अध्यक्ष मा.मंत्री सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) आहेत व मा.राज्यमंत्री (सार्वजनिक बांधकाम) हे सहअध्यक्ष असून, महामंडळाचा दैनंदिन व्यवहार, उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालकामार्फत केला जातो.

## ४. **(अ) कार्यपूर्तीचे वेळापत्रक**

ठेकेदारांची नोंदणी, विविध ना-हरकत प्रमाणपत्रे मिळण्यासाठी लागणारा कालावधी, त्यास सक्षम अधिकारी इ. ची माहिती कार्यपूर्तीचे वेळापत्रकात (परिशिष्ट - ?ब?, ?क?)नमूद केली आहे. अर्जाचा विहित नमुना व जोडावयाची आवश्यक कागदपत्रे याची माहिती विहित फी भरुन संबंधित विभागीय कार्यालयात मिळू शकेल.

नैसर्गिक आपत्ती, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न इ. उद्‌भवल्यास या वेळापत्रकातील कार्यपूर्तीच्या कालावधीत वाढ होऊ शकेल.

(ब) **माहितीची सुलभता**

विभागाच्या वेबसाइटवरुन (संकेत स्थळावरुन), तसेच वेळोवेळी प्रसिध्द केल्या जाणा-या पत्रकांव्दारे जनतेला आकडेवारीचा तपशील सुलभतेने उपलब्ध होईल.

**(क) खाजगीकरण**

विशेषतः शहरी भागाच्या विकास कामासाठी अर्थसंकल्पातून उपलब्ध होणारा अल्प निधी व काळाची गरज, या कारणांमुळे विभागाने विकास कामांमध्ये खाजगी क्षेत्राचा सहभाग ''बांधा , वापरा व हस्तांतरीत करा'' या तत्वावर सुरु केला आहे. यामुळे ग्रामीण भागाकडे अधिक विकास निधी उपलब्ध करणे शक्य होणार आहे. कार्यक्रमाची परिणामकारकता, जनतेचे अभिप्राय इ. चा अभ्यास करुन पुढील दिशा व धोरण ठरविले जाईल. खाजगीकरणांतर्गत मोठया कामांसाठी उदा. एकात्मिकृत रस्ते विकास कार्यक्रम इ. स्वरूपाची कामे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत करण्यात येतात.

## ५. **वाहतुकीस सुरक्षित रस्ते**

विभागाने रस्त्यांची सुरक्षितता वाढविण्यासाठी ''अपघात निवारण समिती'' स्थापन केली आहे. ही समिती प्रत्यक्ष पाहणी करुन रस्त्यांवरील अपघात प्रवण स्थळे शोधते व अशा स्थळांची सुधारणा करण्यासाठी उपाययोजना सुचविते.

समितीने सुचविलेल्या स्थळांची सुधारणा टप्प्याटप्प्याने हाती घेण्यांत येते. तपशीलवार व आवश्यक असे माहितीफलक रस्त्यांवर लावले जातील जेणेकरुन रस्ते वाहतुकीस पादचा-यांसह सर्वांना सर्वकाळ सुरक्षित राहतील.

## ६. (अ) गा-हाणी / तक्रारी यांचे निराकरण

कार्यपूर्तीस होणारा विलंब वा अन्य कांही गा-हाणी विभागाबाबत अथवा काही कामाबाबत असतील तर, त्यासाठी नागरिकांनी ज्या विशिष्ट कार्यालयाविरुध्द गा-हाणे/ तक्रार असेल त्या कार्यालयाच्या वरिष्ठ कार्यालय प्रमुखाकडे तक्रार नोंदवावी म्हणजे उदाहरणार्थ -उपविभागकार्यालया विरुध्द गा-हाणे / तक्रार असल्यास विभाग कार्यालयप्रमुखाकडे म्हणजे कार्यकारी अभियंता यांचेकडे गा-हाणे मांडावे, विभाग कार्यालयाविरुध्द गा-हाणे / तक्रार असल्यास मंडळ कार्यालयाच्या अधीक्षक अभियंत्याकडे गा-हाणे मांडावे. अशा गा-हाणी / तक्रारींचे निराकरण वरिष्ठ कार्यालयाकडून ७ दिवसात करण्यात येईल. गा-हाणी / तक्रारी नोंदविण्यासाठी प्रत्येक कार्यालयात स्वतंत्र पेटी ठेवण्यात येईल.

गा-हाणी समक्ष भेटीत/पत्राने वा 'ई' मेलव्दारेही नागरिक मांडू शकतात.

## (ब) नागरिकांच्या सनदेचा आढावा/ सिंहावलोकन

या नागरिकांच्या सनदेच्या उपयुक्ततेबाबतचा तथा परिणामकारकतेचा आढावा सा. बां. विभागाकडून घेण्यात येईल.

## (क) जनसामान्यांकडून सूचना

ही नागरिकांची सनद सर्वसामान्य नागरिकांच्या छाननीसाठी नेहमीच खुली असेल व सन्माननीय नागरिकांच्या बहुमुल्य सूचनांचा गांभिर्यपूर्वक विचार करुन, त्यात वेळोवेळी सुधारणा घडवून आणता येईल. ही नागरिकांची सनद स्वतःहून कांही नवीन कायदेशीर हक्क निर्माण करीत नाही. ती ग्राहकांना म्हणजेच सा. बां. विभागाच्या सेवा उपभोगणा-या नागरिकांना जादा हक्क मांडण्यासाठी मदत करते.

## ७. नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या या नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी दिनांक १५/८/२००५ पासून करण्यास विभाग कटिबध्द आहे.

सनदेस व्यापक प्रसिध्दी देऊन, नागरिकांच्या प्रतिक्रिया/ अभिप्राय मागविण्यात येतील व त्यांच्या सूचनांचा यथोचित आदर करुन आवश्यक बदल करण्यात येतील.

सा. बां. विभाग खात्रीपूर्वक गुणवत्तेची सेवा पुरविण्याची हमी देत आहे. विभागाच्या कुठल्याही माहितीसाठी नागरिकांना संवेदनशील, सौजन्यपूर्ण व मदत करण्याच्या भावनेने वर्तणूक मिळेल. कार्यपध्दती अधिक लोकाभिमुख, सुलभ व आटोपशीर करण्यासाठी नागरिकांचा सल्ला घेतला जाईल. भ्रष्टाचारास आळा घालण्यात येईल. तसेच नागरिकांच्या गा-हाण्यांचे कालबध्द निराकरण करण्यात येईल.

# परिशिष्ट - अ

## वृक्ष तक्ता



## परिशिष्ट 'ब'
## कार्यपूर्तीचे वेळापत्रक

| अ. क्र. | कार्यसूची | कार्यवाही करणारा सक्षम अधिकारी | कार्यपूर्तीचा कालावधी मर्यादा |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |
| १ | कंत्राटदार वर्ग १अ, १ब, १क, २ व ३ यांची नोंदणी व नुतनीकरण | सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई. | ७५ दिवस |
| २. | कंत्राटदार वर्ग ४ व ४(अ) नोंदणी व नुतनीकरण | मुख्य अभियंता, क्षेत्रिय कार्यालय | ६० दिवस |
| ३. | कंत्राटदार वर्ग ५,६ आणि बेरोजगार अभियंतांचे नोंदणीकरण व मजूर सहकारी संस्था वर्ग अ यांचे वर्गीकरण व नुतनीकरण | अधीक्षक अभियंता | ३० दिवस |
| ४. | कंत्राटदार वर्ग ७,८,९ आणि मजूर कामगार सहकारी संस्था वर्ग ब यांचे वर्गीकरण, इमारत देखभाल व स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकाची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांचे वर्ग ७ | कार्यकारी अभियंता | ३० दिवस |

| अ. क्र. | कार्यसूची | कार्यवाही करणारा सक्षम अधिकारी | कार्यपूर्तीचा कालावधी मर्यादा |
|---|---|---|---|
| | मध्ये नोंदणीकरण व नुतनीकरण | | |
| ५. | विश्रामगृहांचे आरक्षणपत्र | कार्यकारी अभियंता | ७ दिवस. शिवाय ऑनलाइन आरक्षणही उपलब्ध |
| ६. | रस्त्याच्या कडेला असलेल्या इमारतीचा ना हरकत परवाना | कार्यकारी अभियंता | ३० दिवस |
| ७. | पेट्रोल पंप आणि पेट्रोल पंपाच्या पोहोच मार्गाचे ना हरकत प्रमाणपत्र | शासन | ६० दिवस |
| ८. | रस्ता ओलांडून जाणा-या वाहिन्यांसाठी ना-हरकत प्रमाणपत्र | मुख्य अभियंता-राष्ट्रीय महामार्गासाठी व अधीक्षक अभियंता-इतर मार्गासाठी | ३० दिवस |
| ९. | चलतचित्रपट गृहांचे योग्यता प्रमाणपत्र | कार्यकारी अभियंता | १५ दिवस |
| १०. | सरकारी इमारतींचे ''ना उपलब्धता'' प्रमाणपत्र. | कार्यकारी अभियंता | १५ दिवस |
| ११. | सरकारी निवासस्थान न | कार्यकारी अभियंता | ७ दिवस |

| अ. क्र. | कार्यसूची | कार्यवाही करणारा सक्षम अधिकारी | कार्यपूर्तीचा कालावधी मर्यादा |
|---|---|---|---|
| | मिळण्याचे प्रमाणपत्र (अनुपलब्धता) | | |
| १२. | सरकारी निवासस्थान मिळण्याबाबतचे प्रतिक्षा यादी क्रमांक | कार्यकारी अभियंता | ७ दिवस |
| १३. | सरकारी निवासस्थानी राहणा-या निवृत्त कर्मचा-यांच्या बाबतचे ना हरकत दाखले | कार्यकारी अभियंता | ३० दिवस |
| १४. | रास्त भाडे/ प्रमाणभाडे प्रमाणपत्र | कार्यकारी अभियंता | १५ दिवस |
| १५. | इमारतींच्या भाडयांचे निश्चितीकरण | कार्यकारी अभियंता | १५ दिवस |
| १६. | इमारतीचे मूल्यनिश्चितीकरण | कार्यकारी अभियंता | ३० दिवस |

टिप - सर्व वर्गाच्या नोंदणी व नुतनीकरण करणेसाठी अर्ज कार्यकारी अभियंता यांचे कडे स्विकारण्यात येतात.

## परिशिष्ट - ‘क’
## कार्यपूर्तीचे वेळापत्रक
## ( विद्युत विषयक कामांबाबत )

| **अ.क्र.** | **बाब** | **अर्ज घेणारा व कार्यवाही करणारा सक्षम अधिकारी** | **कार्यपूर्तिचा कालावधी** |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |
| १. | कंत्राटदार वर्ग अ व ब नोंदणी व नुतनीकरण | मुख्य अभियंता (विद्युत) मुंबई | ६० दिवस |
| २. | कंत्राटदार वर्ग क व ड नोंदणी व नुतनीकरण | अधीक्षक अभियंता, प्रादेशिक (विद्युत) मंडळ | ३० दिवस |
| ३. | कंत्राटदार वर्ग इ नोंदणी व नुतनीकरण | कार्यकारी अभियंता (विद्युत) | ३० दिवस |
| ४. | पोलिस मुख्यालयातील दारुगोळा भांडाराचे भूसंपर्कन तपासणी करुन प्रमाणपत्र देणे | कार्यकारी अभियंता (विद्युत) | १५ दिवस |